रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ५३ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २९ जुलै २०२५

किंमत ४ ₹



**HIRING ALERT**
Looking For South Indian Cook
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.


## श्रद्धांजली

# मार्गदर्शक हरपला



✍ जयंत पाटील, सरचिटणीस, शेकाप

रत्नागिरीतील लांजा येथून अलिबागला आलेले दळी कुटुंब हे केवळ अलिबाग शहरापुरतेच न राहता संपूर्ण तालुक्यात नावलौकिक मिळविलेले कुटुंब आहे. सर्वच क्षेत्रात प्रभावी काम करणाऱ्या दळी कुटुंबातील गजूशेठ यांनी त्यांच्या अंगी असलेल्या विविध गुणांनी संपूर्ण तालुक्यात एक वेगळी छाप उमटवली. त्यांचे वडील व्यवसायानिमित्त मुंबईत आले. त्यानंतर ते अलिबाग येथे स्थायिक झाले. अलिबागला आल्यानंतर त्यांनी पानपट्टीचा व्यवसाय सुरु केला. त्या पानपट्टीच्या व्यवसायातून गजूशेठ यांनी विविध व्यवसाय उभे केले आणि यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक मिळविला. वडिलांनी सुरु केलेल्या पानपट्टीचा व्यवसाय सांभाळत त्यांनी शिक्षण पूर्ण केले व उद्योग उभे केले. त्याचे सर्व श्रेय गजूशेठ यांना जाते.

काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते व स्व. ॲड. दत्ता खानविलकर यांचे समर्थक म्हणूनही त्यांची ओळख होती. स्व. खानविलकर यांच्यासोबत ते शेवटपर्यंत निष्ठेने राहिले. स्व. खानविलकर हेदेखील कोकणातलेच असल्यामुळे त्या दोघांची जवळीक असल्याचे एकंदरीत त्यांच्या वाटचालीतून दिसते. ॲड. खानविलकर यांच्या सर्व निवडणुकीत सर्व शक्तीने उतरणारे गजूशेठ मी लहानपणापासूनच बघितले. अलिबाग शहराबरोबरच खंडाळे, गोंधळपाडा, वेश्वी, मुळे आदी विविध ग्रामीण भागात त्यांच्या विविध व्यवसायामुळे एक वेगळा प्रभाव त्यांनी पाडलेला आम्ही बघितला. खानविलकर यांच्या आयुष्याच्या शेवटी त्यांची आणि माझी जवळीक करण्याचा प्रयत्न गजूशेठने केला आणि तो शेवटपर्यंत कायम राहिला. काँग्रेससाठी खानविलकर व गजूशेठने आमच्याबरोबर जो संघर्ष, त्याग केला, त्याची कदर खऱ्या अर्थाने त्यांच्या पक्षाने केली नाही. नवीन पिढीला हे माहिती नाही.

पूर्वीचे अलिबाग आणि दळी कुटुंबियांचे विविध क्षेत्रातील वर्चस्व आणि दर्जादेखील नाविन्यपूर्ण असायचा. या कुटुंबाबरोबर माझी २५ वर्षांची जवळीक आहे. गजूशेठ स्पष्टवक्ते होते. उत्तम काम केल्यास त्यांच्याकडून मिळणारी कौतुकाची थाप आजही आठवते. डोक्यावर हात ठेवून ते आशीर्वाद देत. गेल्या २५ वर्षांत त्यांनी अनेक सूचना केल्या. चुकल्यास स्पष्टपणे सांगायचे. एखाद्या विषयाची चुकीची मांडणी केल्यास आपुलकीने मला सांगायचे. त्यांचे मार्गदर्शन तसेच सूचना ऐकत असल्यामुळे जेव्हा त्यांची भेट होत असे, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आजही आठवतो.

त्याकाळी अलिबाग शहरावर ॲड. खानविलकर व दळी यांचे वर्चस्व होते. १९८५ नंतर शेकापमध्ये आम्ही तरुण मंडळी सक्रिय झालो आणि शेकापने वर्चस्व मिळविले, ते आजपर्यंत टिकवून ठेवले. मात्र, याचे कधी गजूशेठना वाईट वाटले नाही. त्याबाबत त्यांनी कधीच खंत व्यक्त केली नाही. मी व सहकाऱ्यांनी जी कामे शहरात केली, त्यासाठी अनेकदा त्यांनी सूचना केल्या. आज अलिबागमध्ये ज्येष्ठ नागरिक संघ संघटित आहे, त्यासाठी ल.नि. नातू व दळी यांचे मोठे योगदान आहे. त्यांचे योगदान ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व सदस्य कधीही विसरु शकणार नाही, असं मला वाटतं.

अलिबागमध्ये पहिलं टुरिंग टॉकिज त्यांनी सुरु केले. त्यानंतर काही वर्षांनी रायगड जिल्ह्यात पहिलं सुसज्ज, अद्ययावत व सर्व सोयी उपलब्ध असणारे चित्रपटगृह त्यांनी उभारले. आजही त्यांचे चिरंजीव ते चालवतात. गजूशेठ यांनी कशाचीही पर्वा न करता सोनटक्के नावाचे आर्किटेक्ट पुण्याहून आणले होते. अलिबागमध्ये पहिल्यांदा आरसीसी बांधकामाचे चित्रपटगृह त्यांनी उभारले.

गजूशेठ नेहमी माझ्या वाढदिवसानिमित्त सकाळी घरी येऊन आशीर्वाद द्यायचे. यावर्षी त्यांचे चिरंजीव आले होते. त्यावेळी त्यांची तब्येत बरी नसल्याचे त्यांच्या मुलांकडून समजले. त्यावेळी अलिबागचे सुसज्ज नाट्यगृह गजूशेठने बघावे, अशी इच्छा मी व्यक्त केली. त्यांना आणण्यासाठी वाहन पाठवितो, असेही सांगितले. मात्र, तशी परिस्थिती नसल्याचे त्यांच्या मुलांनी सांगितले. व्यस्त कामकाजामुळे त्यांना भेटणं शक्य झालं नाही. ते अचानक आपल्यातून निघून जातील, असे अजिबात वाटले नव्हते. आयुष्य आपल्या हातात नसतं. मात्र, त्यांची शेवटची भेट घेता आली नाही, याची खंत कायम मनात राहील. गजूशेठ यांच्या सुज्ञ पत्नी, त्यांचं आदरातिथ्य, दोघांनी मिळून माझ्यासोबत केलेले संवाद कधीही विसरणार नाही. त्यांच्या पत्नीने त्यांना आयुष्यात दिलेली साथ मी बघितली आहे.

मला वाटतं, अलिबाग शहराच्या उभारणीमध्ये तसेच उद्योग क्षेत्रात त्यांची उल्लेखनीय कामगिरी आम्ही कधीही विसरणार नाही. विविध संस्थांमध्ये काम करीत असताना त्यांचा अभ्यास तसेच नागरिकांना नम्रतापूर्वक वागणूक हेदेखील विसरता येणार नाही. विधिमंडळाचे कामकाज आटोपल्यानंतर ते नेहमी भाषणे तसेच मांडलेले प्रश्न याचे आवर्जुन कौतुक करीत असत. त्यामुळे उमेद व जिद्द वाढविण्याचे काम त्यांनी केले. ते पक्के खानविलकर भक्त होते. पण, खानविलकरही त्यावेळी सूचना करायचे. तसेच प्रश्न मांडायलाही लेखी द्यायचे. त्यांचे प्रश्न माझ्या स्टाईलने मांडले की कौतुक करायचे. याबाबत ते गजूशेठ यांच्यासोबत चर्चा करायचे. मला वाटतं, कोकणातून अलिबागला आलेले हे कुटुंब स्वःकर्तृत्वावर अलिबागकर झाले. अलिबागच्या विविध उपक्रमात त्यांचे असलेले अग्रेसर योगदान आम्ही अलिबागकर कधीही विसरणार नाही. त्यांनी कर्तबगार चिरजीवांवर घडविलेले संस्कार ही त्यांच्या कुटुंबाची जमेची बाजू आहे. मला कायम मार्गदर्शन, सूचना करणारा खरा मार्गदर्शक हरपला, याचे अतीव दुःख होत आहे. त्यांचे कार्य, त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील.

# दिव्या देशमुख झाली विश्वविजेती

## महाराष्ट्राच्या लेकीचं ‘दिव्या’स्वप्न पूर्ण



| बटुमी | वृत्तसंस्था |

जॉर्जियात खेळल्या गेलेल्या बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत महाराष्ट्रातील दिव्या देशमुखने धमाकेदार विजय मिळवला आणि विश्वचषक विजेतेपद पटकावले. दोन्ही खेळाडूंमधील सुरुवातीचे सामने अनिर्णित राहिले. शनिवार आणि रविवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीने नवीन बुद्धिबळ स्टार दिव्या देशमुखला आघाडी मिळवू दिली नाही. त्यामुळे मूळ सामना १-१ गुणांनी बरोबरीत राहिला.

> मला हे समजून घेण्यासाठी वेळ लागेल. मला वाटते की, हे माझ्या नशिबात होते की मला अशा प्रकारे ग्रँडमास्टर पदवी मिळाली. या स्पर्धेपूर्वी माझ्याकडे एकही नॉर्म नव्हता. ही स्पर्धा माझ्यासाठी खूप महत्वाची आहे. अजून बरेच काही साध्य करायचे आहे. मला आशा आहे की, ही फक्त सुरुवात आहे.
> – दिव्या देशमुख, ग्रँडमास्टर

### चीनला मागे टाकून भारत बनला चॅम्पियन

या स्पर्धेतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे दोन्ही भारतीय खेळाडूंनी चायनीज वॉल तोडून फायनलमध्ये प्रवेश केला होता. महिला गटात टॉप १०० मध्ये चीन अव्वलस्थानी आहे. चीनचे १४ खेळाडूंच्या तुलनेत भारताचे ९ खेळाडू टॉप १०० मध्ये सामील आहेत. पण वर्ल्ड कपमध्ये कोनेरू आणि दिव्याने चीनच्या खेळाडूंना हरवले.

सोमवारी (दि.२८) खेळल्या गेलेल्या रॅपिड राउंडमध्ये जागतिक क्रमवारीत १८व्या स्थानी असलेल्या नागपूरच्या दिव्या देशमुख हिने पहिल्या गेममध्ये पांढऱ्या सोंगट्यांसह सुरुवात केली. आक्रमक खेळ करत तिने जागतिक क्रमवारीत ५व्या स्थानी असलेल्या कोनेरू हम्पीशी आधी बरोबरी साधली. मग रॅपिड राउंडच्या दुसऱ्या गेममध्ये काळ्या •> पान ५ वर

## राज ठाकरेंच्या उपस्थितीत पनवेलमध्ये होणार

# शेकापचा मेळावा



(छायाचित्र : समीर मालोदे)

| अलिबाग | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचा ७८ वा वर्धापन दिन यावर्षी पनवेल येथे आयोजित केला आहे. यानिमित्ताने शनिवारी (दि.२) सकाळी दहा वाजता, नवीन पनवेल येथे पक्ष सदस्यांचा मेळावा होणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती या मेळाव्यात असणार आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्यासह अन्य दिग्गज मंडळी कार्यकर्त्यांना संबोधित करणार असल्याची माहिती शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील यांनी बैठकीत दिली. शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त अलिबागमधील शेतकरी भवन येथे अलिबाग व मुरूड तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी यांची आढावा बैठक सोमवारी (दि.२८) आयोजित करण्यात आली. यावेळी शेकाप राज्य सोशल मीडिया प्रमुख तथा प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकानाथ नाईक, शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप मुरूड तालुका चिटणीस विजय गिदी, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, शेकाप जिल्हा महिला आघाडीच्या •> पान ५ वर

### कार्यकर्त्यांनी मेळाव्यात सहभागी व्हावे : ॲड. गौतम पाटील

प्रत्येक कार्यकर्ता शेतकरी कामगार पक्षाच्या पाठीशी ठाम उभा आहे. वेगवेगळ्या बैठकांतून कार्यकर्त्यांचा उत्साह दिसून आला आहे. शेकापच्या वर्धापनदिनानिमित्त होणाऱ्या मेळाव्यात मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी होतील, असा विश्वास आहे. एक ऐतिहासिक असा हा मेळावा ठरणार आहे. त्या कार्यकर्त्यांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील यांनी आवाहन केले आहे.



## जनतेचे प्रश्न शेकापच सोडविणार

### चित्रलेखा पाटील यांचा विश्वास



| अलिबाग | प्रतिनिधी |

सध्याचे राजकारण अतिशय भयावह आहे. अनेक तरुणांना नोकरीचे गाजर दाखविले जाते. परंतु त्यांना वेतन दिले जात नाही. नोकरी व रस्त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास सत्ताधाऱ्यांना वेळ नाही. हनी ट्रॅप, ऑनलाईन रमीमध्ये नेते मग्न आहेत. अलिबागसह अनेक भागातील रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. खड्ड्यांमुळे अपघात होऊन जीवितहानी होत आहे. त्यामुळे शेतकरी कामगार पक्ष एक वेगळ्या भूमिकेतून आगामी काळात काम करणार आहे. रोजगारासह वेगवेगळे प्रश्न मार्गी लावण्यासाठी लढा दिला जाणार आहे. जनतेचे प्रश्न शेकापच सोडविणार, असा विश्वास शेकाप राज्य सोशल मीडिया प्रमुख तथा प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

शेकाप वर्धापन दिन व इतर विषयांवर चर्चा करण्यासाठी शेकाप भवनमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

यावेळी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, प्रफुल्ल पाटील, अवधूत पाटील, विक्रांत वार्डे, वेदांत कंटक आदी उपस्थित होते. यावेळी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, शेतकरी कामगार पक्षाचा ७८ वा वर्धापन दिन दोन ऑगस्टला होणार आहे.या मेळाव्यात महाराष्ट्राचे नेते राज ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईत शेतकरी कामगार पक्षाचे योगदान राहिले आहे. परंतु, सध्याच्या राजकारणात राज्यात मराठी भाषेवर अतिक्रमण झालेले दिसत आहे. त्यामुळे याविरोधात शेकापची भूमिका •> पान ५ वर

## ‘ऑपरेशन महादेव’ यशस्वी

### पहलगाम हल्ल्यातील मास्टरमाईंडचा खात्मा

| श्रीनगर | वृत्तसंस्था |

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात पर्यटकांचा मृत्यू झाला होता. हा हल्ला करणारे चार दहशतवादी पसार झाले होते. त्यामुळे पहलगाममध्ये निष्पाप भारतीयांची हत्या करणाऱ्यांना शिक्षा कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. दरम्यान, सोमवारी (दि.२८) भारतीय लष्कराने ऑपरेशन महादेव राबवत



श्रीनगरमधील लिडवास परिसरात तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला. लष्कराने ठार केलेल्या दहशतवाद्यांपैकी हाशिम मुसा हा पहलगाम हल्ल्यातील मास्टरमाइंड असल्याचे समोर आले आहे.

# मुरूडचा शाश्वत विकास कोसळला

### ३६ लाख रुपयांचा निधी पाण्यात

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग विधानसभा मतदार संघाचा मी आमदार आहे, अशा बतावण्या करणाऱ्या आमदार दळवी यांचा मुरूडमधील शाश्वत विकास एका महिन्यातच कोसळल्याचे चित्र समोर आले आहे. मागील जून महिन्यात सोलरवर चालणाऱ्या हायमॅक्सचे भूमीपूजन थाटामाटात करण्यात आले. मात्र एक महिन्यातच हायमॅक्सचे खांब कोसळले आहे.

> अतिशय घाईत हे काम केले आहे. २७ जूनला आमदारांनी या कामाचे भूमीपूजन केले. २८ दिवसांनंतर रिचार्ज संपला. सध्या पोल पडले आहे. विकासाने लोटांगण घातले आहे. नगरपरिषदेच्या इंजिनिअरकडे विचारणा केली असता, त्यांच्याकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात आले. निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले होते. नगरोत्थान योजनेमधून ३६ लाख रुपयांचा निधी वापरण्यात आला. हायमॅक्स दिव्यांचा दर्जा खराब आहे. त्यामुळे ठेकेदारावर काय कारवाई करणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.
> – मनिष माळी, उपाध्यक्ष, शेकाप मुरूड तालुका पुरोगामी युवक संघटना

नगरोत्थान योजनेतून ३६ लाख रुपये यासाठी खर्च करण्यात आले. त्यामुळे लाखो रुपयांचा निधी पाण्यात गेल्याची चर्चा सध्या मुरूडमध्ये जोरात सुरू आहे.

लाखो करोडो रुपयांचा निधी विकासाठी आणला आहे, अशा जाहीरातबाजी विद्यमान आमदार दळवी कायमच करीत आले आहेत. परंतु तो निधी कुठे गेला असा प्रश्न मतदार संघातील नागरिकांना पडत आला आहे. मुरूड शहर प्रकाशमान व्हावे, म्हणून १४ ठिकाणी हायमॅक्स बसविण्याची योजना राबविण्यात आली. २७ जूनला •> पान ५ वर

## अल्पवयीन मुलांनी केला महिलेचा खून

**म्हसळा :** जिल्ह्याला हेलावून टाकणारी घटना म्हसळा तालुक्यातील कणघर गावात घडली आहे. कणघर गावातील दोन अल्पवयीन मुलांनी घरात एकटी राहणाऱ्या ७५ वर्षे वयोवृद्ध महिलेचा गळा दाबून खून केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महिला शेवंती सखाराम भावे यांना आरोपी यांनी तिच्या गळ्यातील व कानातील दागिने चोरी करण्याचे उद्देशाने एकाने हात पकडून व एकाने गळा आवळून जीव घेतल्याचे समजते. आरोपीनी आजीचे ९ ग्रॅम वजनाचे ७० हजार रुपये किमतीचे दागिने लंपास करून त्यांनी महिलेचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. अशा पद्धतीने ठेवून लोकांमध्ये वावरत होते. महिलेचा अंत्यविधी पार पडून चार दिवस उलटून गेले. तेव्हा तिचे दागिने गेले कुठे म्हणुन नातलगांनी शोध घेतला असता वृद्ध महिलेचा खून झाला असल्याचे लक्षात आले. महिलेचा मुलगा सुरेश सखाराम भावे यांनी म्हसळा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असता उपविभागीय पोलीस अधिकारी •> पान ५ वर

## ब्रेक फेलः एसटी धडकली घराला

| अलिबाग | प्रतिनिधी |

पेणकडून अलिबागकडे जाणारी एसटी बस बंद घराला धडकली. बसचा ब्रेक फेल झाल्याने एसटी चालकाने सुरक्षेच्या दृष्टीने बस दुसऱ्या बाजूला वळवून प्रवाशांचा जीव वाचविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे होणारी मोठी दुर्घटना टळली असल्याचे बोलले जात आहे. मात्र बंद घराचे प्रचंड नुकसान झाले. ही घटना सोमवारी (दि.२८) सकाळी घडली.

अलिबाग एसटी बस



आगारातील बस पनवेलहून अलिबागकडे येत होते. मात्र अचानक तिचा ब्रेक फेल झाला. कार्लेखिंड येथील चढावावरून उतरणीवर येत असताना अपघात होण्याची भीती निर्माण झाली होती. अखेर एसटी चालकाने सतर्कता दाखवत सागावजवळ डाव्या बाजूला •> पान ५ वर


**भारतीय शेतकरी कामगार पक्ष**
रायगड-अलिबाग
**वर्धापन दिन**
**दिनांक २ ऑगस्ट २०२५**

**लाल सलाम**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा **शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०-०० वाजता सेक्टर नं.५/ए, गुरूद्वाराच्या बाजूला पोलीस ग्राऊंड, नवीन पनवेल येथे पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील** व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला,
**सुरेश नामदेव खैरे**
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग

# विभाग नियंत्रकांचा मनमानी कारभार

## रायगड एसटी प्रेमींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप



| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग - शेगाव, आग्राव -बोरीवली, महाजने-परळ, रेवदंडा- कल्याण या एसटी बसेस यापुर्वी सुरू होत्या. परंतु वेगवेगळी कारणे दाखवून त्या बंद करण्यात आल्या आहेत. थेट जाणाऱ्या प्रवाशांसाठी ही सेवा फायदेशीर ठरत आहे. या मार्गावरील एसटी बस सेवा सुरू करण्याची मागणी रायगडचे विभाग नियंत्रक यांच्याकडे करण्यात आली आहे. परंतु मागण्यांकडे त्यांचा दुर्लक्ष होत असल्याचा आरोप रायगड एसटी प्रेमींनी केला आहे. विभाग नियंत्रकाचा मनमानी कारभार जिल्ह्यात चालू असल्याचा फटका प्रवाशांना बसत असल्याचे सांगण्यात आले आहे. शेगाव, मुंबई, परळ, कल्याण, बोरीवली या ठिकाणी ग्रामीण भागातील मंडळी नोकरी, व्यवसायाबरोबरच कामानिमित्त ये- जा करतात. मागील लॉकडाऊनच्या काळात या सेवा बंद करण्यात आल्या होत्या. कोरोनाचे संकट संपल्यावर अलिबाग-शेगाव, आग्राव- बोरीवली, महाजने-परळ, रेवदंडा- कल्याण एसटी बसेस पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गेल्या तीन ते चार वर्षांपासून या बस सेवा सुरू करण्यासाठी सातत्याने मागणी केली जात आहे. प्रत्येक वेळी चालक, वाहक नाहीत, अशी खोटी कारणे देऊन विभाग नियंत्रक ही मागणी टाळत असल्याचा आरोप रायगड एसटी प्रेमींकडून करण्यात आला आहे. रायगड विभागातील इतर आगारातून नवीन मार्ग सुरू करण्यासाठी चालक, वाहकांची कमतरता भासत नाही. मात्र, अलिबाग-शेगावसह अन्य बस सेवेसाठी दुजाभाव का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अलिबाग आगारातून महाजने येथून सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास परळ एसटी बस सुरू होती. ही सेवा कोरोना काळात बंद केली. त्यानंतर पुन्हा चालू करण्याचा प्रयत्न केला नाही. प्रवासी नसल्याचे सांगून जबाबदारी ढकलण्याचे काम केले जात आहे. अनेक वर्षांपासून नियमित सुरू असलेली आग्राव-बोरिवली बस सेवा बंद करण्यात आली. त्यावेळीही चालक, वाहकांची कमतरता हेच कारण देण्यात आले होते. मात्र, आता नव्याने अलिबाग-बोरीवली शिवशाही बस सुरू करण्यात आली आहे. या शिवशाहीसाठी चालक, वाहक कुठून आले, असा प्रश्न एसटी प्रेमींकडून विचारला जात आहे. अलिबाग-बोरीवली ऐवजी रेवदंडा-बोरीवली ही सेवा सुरू करण्याची त्यांची मागणी विभाग नियंत्रकांनी दुर्लक्षित केले आहे. एसटीला ग्रामीण भागातील जीवनवाहीनी म्हणून ओळखले जाते. स्थानिक व ग्रामीण प्रवासी संख्या वाढावी, गावे, वाड्यांपर्यंत एसटी पोहचली आहे. हात दाखवा, आणि प्रवासी मिळवा, अशा अनेक योजना राबवून ग्रामीण भागातील प्रवासी वाढविण्याचा प्रयत्न एसटी महामंडळ विभागाने केला आहे. मात्र, रायगड विभाग नियंत्रकांना अलिबागच्या बस सेवेशी आणि प्रवासी मागणीशी काहीच देणे घेणे नाही. ते पदाचा गैरवापर करून मनमानी कारभार करीत असल्याचा आरोप रायगड एसटी प्रेमी अमित कंटक यांच्याकडून करण्यात आला आहे.

> **चालक - वाहकांच्या कमतरतेमुळे सेवा सूरू करणे कठीण आहे. अलिबाग - शेगाव वगळता अन्य सेवा सूरू करण्याची कार्यवाही करण्याचा प्रयत्न राहिल.**
> **-दिपक घोडे, विभाग नियंत्रक**

### परिवहन मंत्र्यांकडे तक्रार दाखल

ग्रामीण भागात एसटी बससेवा पोहचावी, ग्रामीण भागातील प्रवाशांना एसटीची चांगली सेवा मिळावी, म्हणून अलिबाग-शेगाव, महाजने परळ, रेवदंडा-बोरीवली एसटी बस सेवा सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून केली जात आहे. प्रवाशांना वेठीस धरण्याचे काम केले जात आहे. अर्जांची दखल प्रशासनाकडून घेतली जात नाही. त्यामुळे रायगड एसटी प्रेमींनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे तक्रार केली आहे.

### ज्यादा गाड्यांना कायम मंजूरी

चालक, वाहकांची कमतरता असल्याचे कारण देत अलिबाग-शेगावसह अन्य मार्गावरील बस सेवा सुरू केली जात नाही. मात्र रायगड विभागात उन्हाळ्यात सुरू केलेल्या काही ज्यादा गाड्यांना कायमस्वरूपी मंजूरी देण्यात आल्या आहेत. यामध्ये अलिबाग-जळगाव, पेण-भगवानगड, कर्जत-तुळजापूर, रोहा-बीड, माणगाव-अहमदपूर या गाड्यांचा समावेश आहे. या गाड्यांना प्रवाशांची मागणी नसतानाही सुरू ठेवण्यात आल्या आहेत.

# शहापूर-धेरंड पुलाची दुरवस्था

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील शहापूर- धेरंड या गावांना जोडणारा पूल जीर्ण झाला आहे. या पुलाची अवस्था बिकट झाली आहे. हा पूल शेवटची घटका मोजत आहे. मात्र आतापर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पेझारी दिवलांग येथील शहापूर धेरंडला जोडणारा उघडीवरील पूल खराब झाला आहे. हा पूल कोसळून मोठी जीवित हानी व वित्तहानी होण्याची शक्यता आहे. पेझारीवरून शहापूर मोठे शहापूर व धेरंड या गावांना जोडणारा रस्ता असून पेझारी जागृत देवस्थानच्या दरम्यान असणाऱ्या उघाडीवर पूल आहे. हा पूल अतिशय जुना आहे. सिमेंट कॉंक्रीटचे केलेले बांधकाम नादूरुस्त होऊन देखील त्याची दुरुस्ती केली जात नाही. पुलाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेले सळया निघाल्या आहेत. हा पूल शेवटची घटका मोजत आहे. या पुलावरून पोयनाड, पेझारी अलिबागवरून शहापूरकडे अवजड वाहनांची ये-जा होत आहे. जागृत देवस्थान ओमकारेश्वर मंदिर याच मार्गावर आहेत. त्यामुळे हा भाग वर्दळीचा कायमच राहिला आहे. या जुन्या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले नाही. त्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जीर्ण पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश दिले असताना शासकीय अधिकारी यांनी या पुलाचे अजून ऑडिट केलेले नाही. ही मोठी चिंताजनक बाब आहे. पावसाळ्यात हा पूल कोसळल्यास मोठी हानी होण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

# खारघरमध्ये संतोष शेट्टींसह सहकाऱ्यांचा शेकापमध्ये जाहीर पक्षप्रवेश




| पनवेल | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचे कार्यालय खारघर कार्यालयाचे उद्घाटन रविवार (दि.२७) जुलै रोजी कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आ. बाळाराम पाटील यांच्या हस्ते पार पडले. यावेळी त्यांनी सांगितले प्रामाणिकपणे कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी शेतकरी कामगार पक्ष नेहमी खंबीरपणे उभा राहतो. यावेळी खारघर शहरातील सामाजिक कार्यकर्ते संतोष शेट्टी आणि महिला आणि पुरुष सहकाऱ्यांनी बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत शेकापक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत माजी आ. बाळाराम पाटील यांनी केले.

याप्रसंगी बोलताना पाटील यांनी सांगितले की, आज खारघरचा जो विकास आपल्याला दिसत आहे तो शेतकरी कामगार पक्षाची ग्रामपंचायत असताना झालेला आहे. पनवेल महानगरपालिका झाल्यानंतर खारघर शहर भकास वाटू लागले आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळेस भाजप आमदारांनी सांगितले होते की, आम्ही कोणताही कर लावणार नाही. मात्र, आता तेच आमदार नागरिकांनी प्रॉपर्टी टॅक्स भरला नाही तर त्यांच्यावर केसेस दाखल करा असे सांगतात. यावरून प्रॉपर्टी टॅक्स बाबत त्यांची दुहेरी भूमिका लक्षात येत आहे. तेव्हा अशा या आमदारांना येणाऱ्या महानगरपालिकेत धडा शिकवा असे सांगण्यात आले.

जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटना प्रसंगी पनवेल शेकाप विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र मढवी, पनवेल महानगरपालिका चिटणीस प्रकाश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.



# महावितरणचा धोकादायक खांब

| कोर्लई | प्रतिनिधी |

साळाव-मुरुड रस्त्यावर राजवाडा ते कोटेश्वरी मंदिर दरम्यान रस्त्यावरील उच्च वीजदाब वाहिनीचा खांब अनेक दिवसांपासून झुकलेल्या अवस्थेत असून याकडे महावितरणच्या दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मुरुडच्या महावितरणाच्या अधिकारी वर्गाने यात तातडीने लक्ष देऊन योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



● श्रावण महिन्यातील पहिल्याच सोमवारी अलिबागमधील आंग्रे कालीन काशीविवेश्व मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.



● नागपंचमीनिमित पारंपारिक मातीचे नाग उरण बाजारात विकावयासाठी आले, असून नागरिक खरेदी करतांना.

**व्यवसायाला मेहनतीची साथ** | **वाडेकरांच्या व्यवसायाला ४० वर्षांची परंपरा**

# महेंद्र वाडेकरने व्यवसायात उमटविली मोहोर



| चौल | प्रतिनिधी |

स्वप्नं सत्यात उतरवण्यासाठी जीवतोड मेहनत केल्यास एक ना एक दिवस यश आपल्याकडे आपोआप चालत येते, ही कहाणी आहे अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील चणे-शेंगदाणे विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या वाडेकर कुटुंबाची. गेली चाळीस वर्षे हे कुटुंब या व्यवसायात आहे. याच कुटुंबातील महेंद्र वाडेकर या तरुणाने स्वतःला सिद्ध करत या व्यवसायात आपली मोहोर उमटवली आहे.

व्यवसाय करण्याची जिद्द आणि चिकाटी व मेहनत घेण्याची इच्छाशक्ती असली, की व्यवसायात मोठी झेप घेता येते, हे रेवदंडा येथील महेंद्र वाडेकर या तरुणाने दाखवून दिले आहे. चणे-शेंगदाणे विकणारा हा तरुण आज याच व्यवसायात यशस्वी झाला असून, संपूर्ण कुटुंबाचा भार स्वतःच्या खांद्यावर पेलत आहे. त्याचे काका रवींद्र वाडेकर यांचेही या व्यवसायात मोलाचे सहकार्य असल्याचे महेंद्रने निक्षून सांगितले.

वाडेकर कुटुंबाचे महेंद्र चणा मार्ट हे रेवदंडा येथे ४० वर्षांपासून चणे-फुटाणे विक्रीचे दुकान अहे. आपल्या कुटुंबियांनी सुरु केलेला व्यवसाय त्यांची दुसरी पिढीसुद्धा तितक्याच मेहनतीने पुढे नेत असल्याने महेंद्र या तरुणाच्या कष्टातून दिसून येते. आईवडिलांच्या निधनानंतर लहानपणीच व्यवसायाची जबाबदारी महेंद्रवर पडली. सकाळी उठून दुकान लावण्यापासून चणे-वाटाणे, शेंगदाणे भाजण्यापर्यंत सर्व कामे सफाईदारपणे करताना पाहून नवल वाटते. याबाबत त्याला विचारले असता, कोणताही व्यवसाय लहान-मोठा नसतो, तो फक्त आणि फक्त व्यवसाय असतो. तुम्ही करीत असलेले प्रत्येक काम सन्मानजनक असते, असे उत्तर त्याने दिले.

दुकानासाठी लागणारा सर्व कच्चा माल वाशी येथील मार्केटमधून आणण्यात येतो, असे त्याने सांगितले. महेंद्रचे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. परंतु, व्यवसाय करीत असताना शिक्षण आड येत नसल्याचे महेंद्रने सांगितले.

### काकामुळे धंद्याला उभारी

सणासुदीच्या काळात धंदा म्हटले की घरची माणसे असतील तेवढी कमीच. काका रवींद्र वाडेकर याची मदत मोलाची आहे. महेंद्र चणामार्टचा डोलारा उभारण्यात काकाचीच मेहनत, कष्ट मोठे आहेत. अलिबाग, कुरुळ, हटाळे, सहाण आदी ठिकाणच्या आठवडा बाजारात चणे-फुटाणे विक्रीचे दुकान लावण्यात येते. गणपती विसर्जनस्थळी, नवरात्रौत्सवात भरणाऱ्या यात्रांमध्ये चणे विक्रीचा व्यवसाय करतो. या सर्व धावपळीत काकाची साथ लाभते.


## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२२२२
☎ : (०२५३) २२३१७१४ | २२३१७१५ | २२३०१०६ | २२३०४५९

NAAC A — नॅक मानांकित 'अ' श्रेणी

शैक्षणिक सत्र जुलै २०२५
ऑनलाईन प्रवेश सुरू
अंतिम तारीख १० ऑगस्ट २०२५

तुमच्या उज्ज्वल भवितव्याचे प्रवेशद्वार



सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

वैशिष्ट्ये: रोजगाराभिमुख शिक्षण, वेब रेडिओ, दृक-श्राव्य माध्यम आणि मोबाईलद्वारे मार्गदर्शन

**आता रेग्युलर पदवीसोबत दूरशिक्षणाद्वारे अधिकची एक पदवी मिळवा !**

**तसेच मुक्त विद्यापीठातूनच एकाच वेळी दोन शिक्षणक्रमास प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध !**

**मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ मानवी हक्क ❖ संमंत्रक प्रशिक्षण ❖ पाली
पदविका ❖ वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन ❖ गांधी विचारदर्शन
पदवी ❖ बी.ए. (मराठी, उर्दू माध्यम) ❖ बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या ❖ ग्रंथालय व माहितीशास्त्र (B.Lib. & I.Sc.)
पदव्युत्तर पदवी ❖ एम.ए. समाजशास्त्र (मराठी/इंग्रजी) ❖ एम.ए. राज्यशास्त्र (मराठी/इंग्रजी) ❖ एम.ए. मानसशास्त्र (इंग्रजी माध्यम) ❖ एम.ए. इतिहास ❖ एम.ए. इंग्रजी ❖ एम.ए. जनसंज्ञापन व पत्रकारिता (MA MCJ) (इंग्रजी माध्यम) ❖ ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (M.Lib. & I.Sc.) ❖ एम.ए. मराठी ❖ एम.ए. हिंदी ❖ एम.ए. उर्दू ❖ एम.ए. अर्थशास्त्र ❖ एम.ए. लोकप्रशासन

**संगणकशास्त्र विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ Advanced Excel ❖ Computerised Financial Accounting ❖ Advanced Computerised Financial Accounting ❖ Data Analytics ❖ Data Analytics with internship ❖ Cyber Acts ❖ CDR Analysis & Cyber Crime Investigation ❖ Mobile & Cyber Forensics
पदविका ❖ Computerised Financial Accounting ❖ Cyber Crime Investigation
पदवी ❖ Bachelor of Computer Application (BCA) ❖ B.Sc. Data Science
पदव्युत्तर पदवी ❖ Master of Computer Applications (MCA)

**आरोग्य विज्ञान विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ आरोग्यमित्र ❖ रुग्णसहायक ❖ Nutrition & Dietetics ❖ Curative Yoga
पदविका ❖ योगशिक्षक ❖ नृत्ययोगसूत्र ❖ रुग्णसहायक ❖ Diploma in Nutrition & Dietetics ❖ Advance Diploma in Nutrition & Dietetics ❖ Advance Diploma in Counseling & Mental Health
पदव्युत्तर पदवी ❖ M.A. in Yoga

**शिक्षणशास्त्र विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ बालसंगोपन आणि रंजन शिक्षण ❖ आशययुक्त अध्यापन पद्धती ❖ स्वयं-सहायता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम : मूलभूत ❖ मूल्य शिक्षणाची मूलतत्त्वे : मूलभूत ❖ घरकामगार कौशल्य विकास
पदविका ❖ शालेय व्यवस्थापन
पदव्युत्तर पदवी ❖ एम.ए. (शिक्षणशास्त्र)

**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ Industry Connect Internship ❖ Building Employability Skills ❖ Innovation & Entrepreneurship
पदविका ❖ Diploma in Event Management ❖ सहकार व्यवस्थापन ❖ सहकार व्यवस्थापन (बँकिंग) ❖ एव्हीएशन, हॉस्पिटॅलिटी आणि ट्रॅव्हल व टुरिझम मॅनेजमेंट ❖ ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट
पदवी ❖ बी.कॉम. (मराठी/इंग्रजी माध्यम) ❖ B.A. in Facility & Services Management ❖ B.B.A. in Event Management ❖ B.B.A. in Accounting & Financial Management
पदव्युत्तर पदवी ❖ एम.कॉम. ❖ एम.बी.ए. (ह्युमन रिसोर्स / फायनान्स/मार्केटिंग)

**विज्ञान विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ मधुमक्षिका पालन
पदविका ❖ Dip. in Statistics ❖ Dip. in Essential Skills
पदवी ❖ B.Sc. (PCM) ❖ B.Sc. (BCZ) ❖ B.Sc. (Hons) Environmental Science
पदव्युत्तर पदवी ❖ M.Sc. (Environmental Science) ❖ M.Sc. (Mathematics) ❖ M.Sc. (Mathematics with Computer Applications) ❖ M.Sc. (Physics) ❖ M.Sc. (Chemistry) ❖ M.Sc. (Zoology) ❖ M.Sc. (Botany)

**कृषि विज्ञान विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ माळी प्रशिक्षण ❖ कृषि अधिष्ठान ❖ श्वानपालक प्रबोधन
पदविका ❖ कृषि व्यवसाय व्यवस्थापन ❖ कृषि पत्रकारिता ❖ उद्यानविद्या ❖ फळबागा उत्पादन ❖ भाजीपाला उत्पादन ❖ फुलशेती व प्रांगणउद्यान

**स्कूल ऑफ डिजीटल एज्यूकेशन**
प्रमाणपत्र ❖ परसबाग ❖ मूल्य शिक्षणाची मुलतत्त्वे : मूलभूत (मराठी/इंग्रजी माध्यम) ऑनलाईन ❖ IBM Certificate Programs in Emerging Technologies

**ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा**
❖ शेतकरी उत्पादक कंपनी व्यवस्थापन ❖ ग्राम रोजगार सेवक कौशल्य

**ललित कला केंद्र**
❖ Diploma in Dramatics

**निरंतर शिक्षण विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ German ❖ French ❖ English ❖ Beauty Parlour ❖ Video Production ❖ Digital Photography ❖ Information Technology for School going Learners (Elementary) ❖ Information Technology for School going Learners (Secondary)
पदविका ❖ Interior Design & Decoration ❖ Electrician & Domestic Appliances Maintenance ❖ Fitter ❖ Civil Supervisor ❖ Computer Hardware Maintenance & Networking ❖ Fire & Safety ❖ Fashion Design ❖ Adv. Dip. in Fashion Design ❖ Interior Design ❖ Adv. Dip. in Interior Design ❖ Automobile Techniques ❖ Fine Arts Painting ❖ Hospitality Studies ❖ Adv. Dip. in Hospitality Studies ❖ Dip. in Shipping and Logistics ❖ Adv. Dip. in Shipping & Logistics ❖ Dip. in Local Self Government ❖ Diploma in Local Government Financial Management ❖ Diploma in Value Education & Mindfulness ❖ Advance Diploma in Value Education & Mindfulness ❖ Drone System Introductory Programme ❖ Drone System Intermediate Programme ❖ Adv. Drone System Programme ❖ DGCA certified Drone Pilot
पदवी ❖ B.Sc. (Media Graphics and Animation) ❖ B.Sc. (Hospitality Studies) ❖ B.Sc. (Hons) Fire & Industrial Safety

**व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा**
प्रमाणपत्र ❖ Certificatein Fundamentals of Wind Energy & Turbine Technology ❖ Certificate in Wind Farm Safety & Compliance ❖ Certificatein Solar PV Technology & Installation ❖ Certificate in Repair & Maintenance of HeavyEarth moving Machines ❖ Diploma in Solar PV Technology Operations and Maintenance ❖ Diploma in Renewable Energy Safety Inspectors & Operations Managers ❖ Advance Diploma in Wind Technology & Management

"सायबर सुरक्षा (Cyber Security) अभ्यासक्रम हा एक ऑडीट कोर्स असून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणक्रमांना अनिवार्य करण्यात आला आहे. त्यानुसार मूळ शिक्षणक्रम पूर्ण करण्यापूर्वी सायबर सुरक्षा (Cyber Security) अभ्यासक्रम उत्तीर्ण करणे आवश्यक आहे."

**ऑनलाईन प्रवेशासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा किंवा खालील संकेत स्थळाला भेट द्या.**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची विभागीय केंद्र**

| अमरावती | छत्रपती संभाजीनगर (०२४०) | मुंबई (०२२) | नागपूर |
|---|---|---|---|
| ९५९५१९७०९९ | २३१०६६/७७/८८, ८३७९९९०२३६ | २३८७४१८०/८७, ९९६९०१३८८६ | ९४२२२४७२९५ |
| **नाशिक (०२५३)** | **पुणे (०२०)** | **कोल्हापूर (०२३१)** | **नांदेड** |
| २३१७०६३, ९१२२३७९३१९ | २४४९११०७, ८३२९२५६७३६ | २६०७०२२/२३, ९४२३९७९७५०, ९४२३९७९६४५ | ९६८९१७४८७८ |

● www.ycmou.ac.in ● http://ycmou.digitaluniversity.ac श्री. दिलीप भरड, कुलसचिव

HELPLINE ☎ (०२५३) २२३०५८० | २२३१७१५ | २२३०१०६ | २२३१७१४ ✉ nondani@ycmou.digitaluniversity.ac
9307579874 | 9307567182 | 9272046725

Kanchan / P25-125

# त्यांची जागा तुरुंगात

लाडकी बहीण योजनेमधील २६ लाख ३४ हजार जणी अपात्र ठरल्या आहेत. म्हणजे ही एकूण सुमारे पाच हजार कोटींची भानगड आहे. बाकीचे तर सोडाच, पण तब्बल १४ हजार पुरुषांनीही या योजनेचा फायदा घेतला असे आता उघड झाले आहे. त्यांना वर्षभरात सुमारे २१ कोटी रुपये दिले गेले. विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी हे सगळे केले गेले. खरे तर हा संबंध जोडून भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली फडणवीस, शिंदे आणि अजितदादा यांच्याविरुध्द खटलेच दाखल करायला हवेत. निवडणुकीच्या प्रचाराच्या काळात व नंतरही या तिघांनी व त्यांच्या पक्षांनी आपल्या यशाचे श्रेय लाडकी बहीण योजनेलला दिले आहे. ही योजना जाहीर झाली आणि विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असे तेव्हाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वारंवार म्हणत असत. विधानसभा निवडणुकीला तीन महिने बाकी असताना घाईघाईने ही योजना जाहीर करण्यात आली व एक जुलैपासून तिची अंमलबजावणी करण्यात आली. या योजनेत सरसकट अर्ज मंजूर होत आहेत व मोठा भ्रष्टाचार चालू आहे असा आरोप तेव्हाही केला जात होता. पण या भानगडी बाहेर काढल्या तर महिलांची मते मिळणार नाहीत अशी भीती विरोधकांना वाटत होती. ती किती खरी होती हे आता दिसते आहे. या बनावट लाभार्थ्यांची २६ लाख मते नक्कीच महायुतीकडे गेली असणार असे म्हणता येऊ शकते. कारण, हा सर्व सांगून सवरून केलेला भ्रष्टाचार होता. आपण अपात्र आहोत हे या अर्जदारांना नक्की ठाऊक असणार. तरीही आपला अर्ज मंजूर होणार आहे याचीही त्यांना खात्री असणार. साधारणपणे उघड अशा बेकायदेशीर कृत्ये करायला तळातले सरकारी कर्मचारी सहसा तयार होत नाहीत. कारण या चोऱ्या सहज पकडल्या जाऊ शकतात व आपला गळा धरला जाऊ शकतो अशी भीती त्यांना असते. शिवाय, लाडकी बहीणमधील बेकायदा अर्जांना मंजुरी देऊन त्यांना काहीच पैसे मिळणार नव्हते. तरीही त्यांनी घाऊकपणे अशी प्रकरणे पुढे सरकवली याचाच अर्थ त्यांच्यावर वरच्यांचा दबाव होता.

## भ्रष्टाचार केला कोणी

हा दबाव अर्थातच थेट शिंदे, अजितदादा व फडणवीस यांच्याकडून आला असणार. वास्तविक हे लोक पुन्हा निवडून येतील की नाही याची खात्री नव्हती. लोकसभेला यांचे पक्ष दणकावून हरले होते. तरीही यांनी सत्तेच्या जोरावर अधिकाऱ्यांवर दबाव टाकला आणि अधिकाऱ्यांनी खालच्यांना चेपले असे एकूण चित्र दिसते. याचाच अर्थ समजा उद्या ही भानगड उघडी झाली तरीही आपल्यावर कोणतीही कारवाई होणार नाही याची एक सुप्त हमी सर्वांना दिली गेली असावी. आता नेमके तेच होत आहे. खरे तर या प्रकरणात अर्जांची प्राथमिक छाननी करणाऱ्या कर्मचाऱ्यांपासून ते वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांविरुद्ध खटले दाखल करायला हवेत. त्यांनी कोणत्या स्थितीत अशा बेकायदा मंजुऱ्या घेतल्या याचे जबाब रेकॉर्डवर घ्यायला हवेत. याचे दोन फायदे होतील. या कर्मचाऱ्यांवर राजकीय दबाव होता हे सिद्ध होईल. शिवाय भविष्यात अशा भानगडींमध्ये घाऊक रीतीने सामील होताना सरकारी यंत्रणा दहा वेळा विचार करील. या योजनेत १४ हजार पुरुषांचे अर्ज मंजूर करणाऱ्यांवर तर विशेष कारवाई करायला हवी. त्यांच्या अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडली होती याचाही तपास करायला हवा. त्यात त्यांनी स्वतःचे आधारकार्ड इत्यादी दिले असेल तर ते पुरुष असल्याचे स्पष्ट असेल. तरीही हा अर्ज जर मंजूर झाला असेल तर हा सरळच सर्वसंमतीने झालेला भ्रष्टाचार आहे. तो कोणत्या गावात व कोणाच्या मतदारसंघात झाला हे नावनिशीवार जाहीर होण्याची गरज आहे. याच रीतीने ज्यांचे वय ६५ च्या वरचे आहे अशा एक लाख दहा हजार महिलांनाही हा लाभ दिला गेला आहे. त्यांच्या वयाची पडताळणी प्राथमिक टप्प्यातच व्हायला हवी होती. ती का झालेली नाही हे पाहायला हवे. संजय गांधी निराधारसारख्या दुसऱ्या योजनांचा लाभ घेणाऱ्या दोन लाख महिला व चारचाकीच्या मालक असलेल्या सव्वादोन लाख महिलांना लाभ मिळाला. पण मुळात साधी छाननीच इतकी भ्रष्ट होती तिथे अशा लाभार्थी उघड होणे कठीणच होते.

## नोकरशाहीचा दुरुपयोग

खरे तर हे सर्व आक्षेपाचे मुद्दे विरोधकांनी उपस्थित करायला हवेत व जरुर तिथे त्यांनीच खटलेही भरायला हवेत. पण ते इतके दुबळे आहेत की, याबाबत ते तोंडी निषेधाखेरीज काही करीत नाहीत. कदाचित हा भ्रष्टाचार बाहेर काढला तर जनता आणखी विरोधात जाईल अशी भीती त्यांना वाटत असावी. ते खरे असेल तर ते आणखीनच वाईट आहे. ते काही असो. स्वयंसेवी संघटना, माध्यमे इत्यादींनी याबाबत आवाज उठवत राहणे गरजेचे आहे. आतादेखील, तिजोरीत भयंकर खडखडाट झाल्यामुळेच ही पडताळणी सरकारने हाती घेतली. वास्तविक सरकारला ही योजना पूर्ण बंदच करायची आहे. पण निवडणूक जिंकल्याला अजून पुरते एक वर्षही झालेले नाही. त्यामुळे ते शक्य होणार नाही. पण पुढे टप्प्याटप्प्याने हे निकष आणखी कडक केले जातील अशी शक्यता आहे. पण मुद्दा असा की, एखादा पक्ष व सरकार निवडणुका जिंकण्यासाठी तदद्र भ्रष्टाचारी अशी योजना जाहीर करते, त्यात लोकही अंदाधुंद रीतीने सहभागी होतात, सर्वांच्या डोळ्यादेखत हजारो कोटी रुपये लुटले जातात आणि बहुसंख्य समाज यात सामील असल्याने तो यावर गप्प बसतो ही लोकशाहीची भीषण पातळी आहे. या भ्रष्टाचारात सर्वजण सामील आहेत हे खरे असले तरी या गुन्ह्याचे सूत्रधार व खरे लाभार्थी हे सध्याचे सत्ताधारी आहेत. त्यामुळे शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. शिंदे आणि मंडळींनी ही योजना आणली तीच मुळी भ्रष्ट हेतूने. पण त्यांनी त्यात सरकारी यंत्रणेचा वापर करणे व त्यांना भ्रष्टाचार करण्यास प्रोत्साहन देणे किंवा सूट देणे हे भयंकर गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य आहे. तब्बल दोन हजार सरकारी कर्मचारी महिलांनीही या योजनेतून पैसे घेतल्याचे उघड झाले आहे. त्यांचे हे धाडस झाले याचे कारण वरचे राजकारणी व अधिकारी यांचे आपल्याला पूर्ण संरक्षण मिळेल अशी हमी त्या महिलांना मिळालेली असणार. आता झालेली पडताळणी ही प्राथमिक स्वरुपाचीच आहे. याहून अधिक कडक चाळणी लावली गेली तर उर्वरित दोन कोटींपैकी आणखी कित्येक लाख महिला अपात्र असल्याचे आढळून येईल यात अजिबात शंका नाही. आता यापैकी काही अपात्र महिलांकडून पैसे वसूल केले जावेत अशी मागणी होत आहे. ती रास्त आहे. पण या भ्रष्टाचाराला जबाबदार राजकारण्यांना तुरुंगात धाडण्याची मागणी अधिक जोराने पुढे येण्याची गरज आहे. त्यांची जागा तुरुंगातच आहे.

विचार

# गडकिल्ल्यांचे गाढे अभ्यासक

***शिवाजी महाराजांच्या असीम शौर्याप्रमाणेच बुलंद, ताकदवान आणि देदिप्यमान यशाचे साक्षीदार असणाऱ्या दुर्गांमुळेही शिवकाळ ओळखला जातो. आजही गडकिल्ले पाहताना प्रत्यक्ष महाराजांचे दर्शन घडत असल्याची भावना उचंबळून येते. अशातच महाराष्ट्रातील बारा किल्ल्यांवर युनेस्कोची वैश्विक मोहोर उमटणे ही फार मोठी आणि सन्मानाची बाब म्हणावी लागेल. यायोगे जागतीक पटलावर आलेले हे गडकिल्ले वेगळा प्रभाव निर्माण करतील.***

नुकतेच पॅरिसमध्ये युनेस्कोच्या 'आयकोमॉस' म्हणजेच इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मोन्युमेंट्स अँड साईट्स या समितीचे अधिवेशन झाले. ही समिती जागतिक वारसा स्थळांना मान्यता देते. आत्तापर्यंत भारतातील ४३ स्थळांना युनेस्कोकडून जागतिक वारसास्थळाची मान्यता मिळाली आहे. त्यात महाराष्ट्रातील अजंठा, वेरुळ, घारापुरी, छत्रपती शिवाजी टर्मिनस आदी स्थळांचा समावेश आहे. मुख्य म्हणजे जागतिक वारसास्थळांच्या यादीमध्ये आता भारत सहाव्या स्थानी आहे. यापूर्वी १९८३ मध्ये आग्राच्या किल्ल्याला जागतिक वारसा स्थळाची मान्यता मिळाली होती तर २००७ मध्ये दिल्लीच्या किल्ल्याला मान्यता मिळाली होती. २०१३ मध्ये राजस्थानमधील सहा किल्ल्यांना ही मान्यता मिळाली होती. सांगायचा मुद्दा हा की, यापूर्वीही जागतिक वारसास्थळांमध्ये भारतातील किल्ल्यांना मानाचे स्थान मिळाले आहे.

अशा प्रकारे मान्यता मिळवण्याची इच्छा असणाऱ्या राज्यांनी आपल्याकडील अशी कोणती स्थळे आहेत हे सांगणारे प्रारुप तयार करुन केंद्राकडे पाठवायचे असते. त्यावरुन केंद्रातील समिती छाननी करते आणि एक प्रस्ताव स्विकारते. अशाप्रमाणे विविध देशातील विविध राज्यांकडून आलेल्या एकूण प्रस्तावांपैकी पाच प्रस्ताव समितीने विचाराधीन ठेवले. महाराष्ट्राची संकल्पना लोकांपुढे मांडण्यासाठी काही मंडळींचे विशेष योगदान होते. म्हणूनच प्रत्येक देशातर्फे एकच प्रस्ताव जावा लागत असताना भारताकडून 'मराठा मिलिटरी लँडस्केप' या शीर्षकाखाली महाराष्ट्राने दिलेला प्रस्ताव युनेस्कोकडे पाठवला गेला. 'मराठी एकात्मिक लष्करी प्रणाली' असे याचे मराठीत भाषांतर होते. जानेवारी २०२४ मध्ये भारताकडून युनेस्कोकडे हा प्रस्ताव गेला. पुढील १८ महिने तेथील वेगवेगळ्या तज्ज्ञांनी त्यावर चर्चा केली. मात्र चर्चेअंती भारताच्या प्रस्तावाला मान्यता देता येणार नाही, असे सांगितले गेले. याचे कारण आत्तापर्यंत ही मान्यता दिली गेलेली ठिकाणे एकच होती. म्हणजेच अजंठाला हा बहुमान मिळाला, पण जवळच्या वेरुळला हा बहुमान त्याच वर्षी मिळाला नाही. पुढच्या वर्षी ही मान्यता मिळाली. अशाच प्रकारे जागतिक वारसा यादीत स्थान मिळालेला चित्तोडचा किल्लाही एकाच भौगोलिक परिसरात आहे. म्हणजेच आत्तापर्यंत एकाच ठिकाणी असलेल्या स्थळांना जागतिक वारस्याचे परिमाण लाभले, मात्र यावेळी भारताने प्रस्तावात बारा वेगवेगळ्या किल्ल्यांचा समावेश केला होता. मात्र त्यांचे भौगोलिक स्थान वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये असले तरी हे सर्व किल्ले मराठा साम्राज्य उभे राहण्यात महत्वाचे साक्षिदार राहिले. हे लक्षात घेता असे प्रस्ताव नियमांमध्ये बसत नसल्याचे तसेच यापुर्वी कधीच असे प्रस्ताव स्विकारले गेले नसल्याचे सांगत तो नाकारण्यात आला. जागतिक वारसा यादीमध्ये अशा प्रकारचा प्रस्ताव स्विकारला गेला नव्हता. त्यामुळे ताजा प्रस्ताव नाकारण्यात आला. मात्र आपली बाजू मांडताना भारताने सांगितले की, मराठ्यांचे (अर्थातच महाराष्ट्राचे) स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान, स्वराज्याचा ध्यास, स्वराज्याचा आवाज निर्माण करणारी ही स्थळे असून शिवकाळात येथे घडलेल्या घटनांपासून प्रेरणा घेऊनच भारतामध्ये पुढे सगळ्या घडामोडी घडत गेल्या आहेत. त्यामुळे ही स्थळे महत्त्वाची आणि जागतिक वारसा अशी ओळख मिळण्याच्या योग्यतेची असल्याचे आपण ठामपणे सांगितले. वेगवेगळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी हे म्हणणे ऐकून घेतले पण लेबनॉन आणि तुर्किये यांनी या ठरवाला विरोध केला. प्रस्ताव दाखल केलेल्या राष्ट्राला प्रतिवाद करता येत नाही. दुसऱ्या कोणी तरी करावा लागतो. त्यामुळेच मग युरोपमधील ग्रीसने प्रतिवाद करताना कल्पना मांडली की, भारताच्या स्वातंत्र्याची आकांक्षा या किल्ल्यांमधून प्रतित होत असल्यामुळे युनेस्कोने प्रस्तावाला मान्यता द्यायला हवी. म्हणजेच पुढे आपल्यापेक्षा अधिक ग्रीसने हा प्रस्ताव लावून धरला आणि मेक्सिकोने त्याला पाठिंबा दिला. खेरीज युक्रेन, केनिया, कझाकिस्तान, व्हिएतनाम, झांबिया, कोरिया, कतार आणि जमैका आदी देशांनीही मेक्सिकोच्या आवाजात आवाज मिसळला आणि ग्रीसचा पाठिंबा अधिक बळकट झाला.

**प्र.के. घाणेकर**

सदर प्रस्तावात नमूद केलेल्या किल्ल्यांची पाहणी करण्यासाठी शिखा जैन यांच्या नेतृत्वाखाली युनेस्कोची एक टीम भारतात आली होती. त्यांनी सगळ्या किल्ल्यांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आणि मराठा मिलिट्री आर्किटेक्चरची म्हणजेच संरक्षणात्मक तटबंद्या, बुरुज, माच्या, बालेकिल्ला, जलाशय, नगारखाने, प्रवेशद्वार गुप्त खलबते करण्याच्या जागांची पहाणी केली. या भेटीनंतर सर्व स्थळांना जागतिक वारसा यादीमध्ये स्थान मिळणे योग्य असल्याचे त्यांनी मान्य केले आणि प्रस्ताव पुढे गेला. विशाल शर्मा हे भारताचे युनेस्कोमधील प्रतिनिधी आहेत तर प्रस्ताव महाराष्ट्राच्या संदर्भात असल्यामुळे विकास खारगे आणि हेमंत दळवी यांनी राज्यातर्फे बाजू मांडण्याची तयारी केली. म्हणजेच शिखा जैन आणि वर उल्लेख तिघांनी हे सगळे अवघड काम मार्गी लावले, असे म्हणावे लागेल. आता जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळालेले राजगड, रायगड खांदेरी, प्रतापगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, शिवनेरी, साल्हेर, पन्हाळा, लोहगड आणि सुवर्णदुर्ग हे महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि जिंजी हा तमिळनाडूतील किल्ला प्रत्येक भारतीयाचे भूषण आहेत. महाराष्ट्रातील अकरा किल्ल्यांपैकी सात आणि जिंजी असे एकूण आठ किल्ले भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याकडे आहेत तर अन्य चार किल्ले राज्य पुरातत्व संचालनालयकडे आहेत.

खांदेरी, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग आणि सुवर्णदुर्ग हे चार जलदुर्ग आहेत तर राजगड, रायगड, प्रतापगड, विजयदुर्ग, खांदेरी आणि सिंधुदुर्ग हे शिवाजी महाराजांनी नव्याने बांधलेले किल्ले आहेत. म्हणजेच ते शिवनिर्मित आहेत. उरलेले शिवनेरी, पन्हाळा, लोहगड, साल्हेर हे शिवपूर्वकालीन किल्ले आहेत. ते शिवरायांच्या ताब्यात आले होते. दुर्दैवाने शिवनेरी कधीच त्यांच्या ताब्यात आला नाही. शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असणारा हा किल्ला पुढे १७३३ मध्ये उद्धव विरेश्वर चितळे या सरदाराने जिंकून मराठी राज्यामध्ये घेतला पण, ही घटना शाहूराजांच्या काळात घडली. १६३० मध्ये या किल्ल्यामध्ये शिवरायांचा जन्म झाला. १६३६ पर्यंत बालशिवबा तेथे होते. पण तिथून बाहेर पडल्यानंतर त्यांना पुन्हा शिवनेरीवर जाता आले नाही. शिवनेरी कधीच त्यांच्या ताब्यात आला नाही. आधी उल्लेख केलेल्या सहा शिवनिर्मित किल्ल्यांबद्दल बोलण्यासारखे खूप आहे. तेथील स्थापत्यशास्त्र वेगळे आहे. बाकीचे किल्ले जुने असल्यामुळे त्यात मराठा स्थापत्यशास्त्र दिसत नाही. पण मराठ्यांनी त्या ठिकाणांचा योग्य प्रकारे उपयोग करुन घेतला. यातील एक न एक किल्ल्यावर शिवकाळातील कोणती ना कोणती महत्त्वाची घटना घडली आहे. म्हणूनच अशा किल्ल्यांना जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

युनेस्कोने यापूर्वी कधीच विखुरलेल्या स्थळांना एकाच वेळी आपल्या यादीत मान्यता दिलेली नाही. ती बाब आपण घडवून आणल्यामुळे मळवाट तयार केली आहे. यापुढे काही देश या वाटेवरुन जाऊ शकतील. हे बारा किल्ले महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, रायगड अशा सहा जिल्ह्यांमध्ये विखुरलेले आहेत. हे वेगळेपणही नोंद घेण्याजोगे म्हणायला हवे. युनेस्कोची मोहोर उमटल्यामुळे काय होणार, हा प्रत्येकाच्या मनात येणारा प्रश्न असेल. याचे उत्तर म्हणजे या स्थळांच्या संरक्षणासाठी युनेस्कोकडून एका पैशाचीही मदत मिळत नाही. म्हणूनच या किल्ल्यांसाठी लगेचच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन काही रक्कम मिळणार नाही. पण या बारा किल्ल्यांसाठी एखादे प्राधिकरण, प्रतिष्ठान निर्माण करुन त्या माध्यमातून किल्ल्यांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी, तेथील सोयीसुविधांसाठी पैसे गोळा करणे आता शक्य होईल. जागतिक मान्यता मिळाल्यामुळे हे काम आंतरराष्ट्रीय पातळीवर करता येईल. जगभरातील लोक ही ठिकाणे पाहण्यास आल्यास मोठी उलाढाल होईलच, खेरीज तोंडातोंडी होणाऱ्या चर्चेचा, प्रसिद्धीचा लाभही संबंधित ठिकाणांना मिळेल. अर्थात हे दरवेळी होतेच असे नाही. जसे की, मालवणजवळ धामापूर नावाचे एक गाव आहे. तेथे जुना बंधारा (८०० वर्षांपूर्वीचा) असून त्याला 'जगातील प्राचीन सिंचन व्यवस्था' म्हणून मान्यता दिली होती. तो पाहण्यास बाहेरचे लोक येतात पण महाराष्ट्रातील किती लोकांना धामापूर माहिती आहे हा प्रश्न उरतो. तसेच लोणार विवराला अशीच मान्यता मिळाली आहे. लोणारमध्ये यादवकालीन तसेच यादवपूर्व काळातील काही मंदिरे असल्यामुळे ते सांस्कृतिकदृष्ट्याही महत्त्वाचे आहे आणि नैसर्गिक दृष्ट्याही त्याला वेगळे महत्त्व आहे. पण आपल्याकडे किती पर्यटन कंपन्या लोकांना तिथे घेऊन जातात? सध्या चर्चेत असणाऱ्या या १२ किल्ल्यांवर जाण्यास सहजमार्ग नाही. रायगडचा रोप वे वगळता अन्य किल्ल्यांवर तशी सोय नाही. त्यामुळेच कष्ट घेऊन तेथे कितीजण जातील हा वेगळा भाग राहतो. पण ही प्रत्येकाच्या मनात अभिमान निर्माण करणारी घटना आहे, याबाबत दुमत नाही. प्रयत्न केले तर आंतरराष्ट्रीय स्तरावरुन पैसे गोळा केल्यास खूप काही साध्य होईल. त्याचे हिशेब ठेवणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर तपासले जाणे आणि त्यातून उत्पन्नाचा चांगला स्त्रोत निर्माण होऊन या किल्ल्यांची स्थिती सुधारणे हे मोठे काम आहे. चांगले गाईड्स तयार करणे, हा परिसर अनधिकृत बांधकामापासून सुरक्षित ठेवणे, अस्वच्छता कमी करणे, स्वत:ची नावे कोरण्यासारखे प्रकार बंद करणे अशा अनेक बाबींकडे लक्ष द्यावे लागेल. तेथील अनावश्यक निर्बंध काढून टाकावे लागतील. मात्र या सगळ्यातून दुर्गसंवर्धनाला नवी दिशा मिळाली आणि अन्य किल्ल्यांवरही त्याचे अनुकरण केले तर सगळे काही चांगले घडेल, अशी अपेक्षा आहे.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

चर्चा आजची

# युवांचा विचार होणे गरजेचे

युवांना रोजगाराचे दालन खुले व्हावी, म्हणून विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी महायूतीच्या सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली. या योजनेला तरुण, तरुणींकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. मात्र याच युवांचे महिनो महिने विद्या वेतन थकले आहे. सभा, बैठकांमार्फत कायम नोकरी देण्याचे आश्वासने देण्यात आली होती. या आश्वासनांना अनेक तरुण बळी पडले. परंतु आता मात्र या युवांचा विचारच केला जात नसल्याचे चित्र संपुर्ण महाराष्ट्रात आहे. तरुणांनी आता आंदोलनाची भुमिका घेतली आहे. त्यामुळे सरकारकडून युवांचा विचार होणे गरजेचे आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली. रोजगार मिळेल या आशेने राज्यातील एक लाख ३४ हजार तरुणांनी या योजनेचा लाभ घेतला. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील एक हजार ६०० युवांचा समावेश आहे.१८ ते ३५ वयोगटातील युवा, युवतींची जिल्ह्यातील ग्रामपंचायत, आरोग्य केंद्र, उपकेंद्रामध्ये डाटा ऑपरेटर म्हणून मानधनावर त्यांची नियुक्ती करण्यात आली. ऑनलाईन काम करण्यापेक्षा ऑफलाईन काम देऊन या तरुणांना राबविण्याचे काम वेगवेगळ्या विभागातून करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्य रुग्ण कक्षातील रुग्णांची तपासणी करणे, ग्राम पंचायतीमधील घरपट्टी, पाणीपट्टी तसेच इतर कामेदेखील करून घेण्यात आली. मागील चार वर्षाची प्रलंबित शासनाची कामे युवांनी केली. त्यावेळी दर महिन्याच्या दहा तारखेला युवा प्रशिणार्थींना विद्या वेतन दिला जात होता. १२ उत्तीर्ण झालेल्या



प्रशिक्षणार्थींना ६ हजार रुपये, डिप्लोमा धारकांना ८ हजार रुपये आणि पदवी आणि पदवीव्युतर धारकांना आठ हजार रुपये असे विद्या वेतन दिला देण्यात आले. आता मात्र वेतन मिळण्यास टाळाटाळ होत असल्याचे युवांकडून बोलले जात आहे.

जिल्हा कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत ही योजना राबविण्यात आली. मार्च ते जूलै महिन्याचे विद्या वेतन अद्याप देण्यात आले नाही.

**प्रमोद जाधव**

२०२४ मध्ये विधानसभा निवडणूकांपुर्वी समोर ठेवून वेगवेगळ्या योजना राबविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा समावेश आहे. आता मात्र या योजनेचा कारभार नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे युवा वर्गात सरकारच्या भुमिकेबाबत तीव्र नाराजी आहे. थकीत विद्यावेतन तातडीने देण्यात यावे.कायम स्वरुपी शासकीय अस्थापनेत रोजगार उपलब्ध करून मिळावा. कार्यरत असलेल्या अस्थापनेतील थकीत विद्या वेतन अदा करण्यात यावे.अस्थापनेत काम करीत असताना ओळखपत्र देण्यात यावे. ३५ वर्ष पुर्ण झालेल्या युवांच्या वयाची अट शिथील करावी अशा अनेक मागण्या युवांकडून करण्यात आल्या आहेत.

राज्यासह रायगड जिल्ह्यातील युवांचे रोजगाराचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली. वेगवेगळ्या भाषणांमधून युवांना कायम नोकऱ्या देणार अशी आश्वासने देण्यात आली होती. ते व्हीडीओ सोशल मिडीयावर व्हायरलदेखील झाले आहेत. मात्र ३५ वर्ष पुर्ण झालेल्या तरुणांच्या रोजगारावर गदा येण्याची भिती निर्माण झाली आहे. ३५ वर्षे पुर्ण झालेल्या तरुणांना कामावर पुन्हा घेतील की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

या योजनेमध्ये तरुणांसह तरुणींचादेखील मोठ्या संख्येने सहभाग आहे. ग्रामपंचायतीपासून वेगवेगळ्या सरकारी यंत्रणेमध्ये सहा ते आठ हजारच्या विद्या वेतनावर युवा काम करीत आहेत. त्यामुळे सरकारने या तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न आणि वेतनाचा प्रश्न लवकरात मार्गी लावावा अशी मागणी अनेक स्तरातून केली जात आहे. जिल्ह्यासह महाराष्ट्रात प्रशिक्षणार्थींवर वेतना अभावी मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. मार्चपासून जूलै महिन्याचे विद्या वेतन न मिळाल्याने युवकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. येत्या १ ऑगस्टला मागण्यांसाठी आमरण उपोषण केले जाणार आहे. तुकाराम बाबा महाराज यांच्या नेतृत्वाखाली सांगली येथील कृष्णामाई घाट येथे हा लढा सुरु केला जाणार आहे. या लढ्यात रायगडमधून दीडशेहून अधिक युवा सहभागी होणार आहे. सरकारकडून युवांना न्याय मिळेल अशी अपेक्षा केली जात आहे.

लोकसंसद

# दुर्मिळ नागवेल आणि रानफुले

श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे. श्रावण महिना म्हणजे मनाला एक वेगळ्या प्रकारचा आनंद देणारा महिना. कारण या महिन्यामध्ये सगळीकडे हिरवळ निर्माण झालेली असते. आषाढ महिन्याच्या शेवटल्या दिवशी अमावस्या असते. आणि मग दुसऱ्या दिवसापासून श्रावण महिना सुरू होतो. आपल्या हिंदू संस्कृतीत



श्रावण महिना पवित्र म्हणून मानला जातो. अमावस्येला दीपपूजा असते. आणि तेव्हापासून श्रावण महिन्यात येणाऱ्या प्रत्येक सणाला दिवे लावण्याचा प्रसंग येतो. पूर्वीच्या जमान्यात आमच्या गावात, घरामध्ये लाईट नव्हती त्यामुळे सणांच्या निमित्ताने घरामध्ये लावलेल्या दिव्यांच्या प्रकाशाने घरातील परीसर उजळून निघायचा. हिंदू पंचांगानुसार श्रावण महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी (जुलै/ऑगस्ट) ही पूजा केली जाते. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण. श्रावण महिना सुरू झाला की, अनेक सण साजरे केले जातात. श्रावणातील अनेक सणांपैकी नागपंचमीसुद्धा असंच एक पर्व आहे. हा पावसाळ्याचा ऋतू असतो. या काळात नाग बिळातून बाहेर पडून जमिनीवर येतात. या बाहेर पडलेल्या नागांमुळे कोणालाही अपाय होऊ नये म्हणून नागदेवतेला प्रसन्न करण्यासाठी नागपंचमीची पूजा करण्यात येऊ लागली. ज्याला नागपंचमी असं म्हटलं जातं. जुन्या रितीरिवाजाप्रमाणे नागपंचमीच्या पूजेसाठी वरील चित्रात दाखविल्याप्रमाणे जंगलात जाऊन कोंबडे नावाची रानफूले व गोमेटीची वेल आदल्याच दिवशी आणून ठेवावी लागतात. त्याप्रमाणे संध्याकाळी चार वाजता जंगलामध्ये जाऊन फुले व वेल आणल्या जातात. आपली हिंदू संस्कृती जपण्यासाठी या गोष्टी कराव्याच लागतात. तरच आपली संस्कृती टिकून राहील. व पुढच्या पिढीला या गोष्टी ज्ञात होतील. आता ती वेल मिळणे खूप दुर्मिळ होऊन बसले आहे.

**– सुभाष मोतीराम पाटील, परहूरपाडा**

दिनविशेष

# श्रावण महिन्यातील पहिला सण म्हणजे नागपंचमी

श्रावण महिन्यातील पहिला आणि महत्त्वाचा सण म्हणजे नागपंचमी. नाग या प्राण्याबद्दल आदर व पूज्य भावना समाजात रुजवण्यासाठी हा सण पाळला जाण्याची परंपरा आहे. या दिवशी घरोघरी नाग देवाची पूजा करून त्याला प्रसन्न करण्याची प्रथा आहे. वेदकाळापासून चालत आलेला हा सण अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. यादिवशी स्त्रिया नवीन अलंकार, वस्त्रे नेसून नागदेवताची पूजा करतात. स्त्रिया पाटावर हळद-चंदनाने नाग-नागीण आणि त्यांच्या पिल्लांची चित्रे काढून त्याला दुध, लाह्या, आघाडा, दुर्वा वाहून पूजा करतात. श्रावण महिन्यात म्हणजेच पावसाळ्यात आघाडा सर्वत्र उगवतो. या सणात या वनस्पतीला



महत्त्वाचे स्थान असते. नागदेवताची पूजा करून त्याला दुध, साखर, उकडीची पुरणाची दिंड करून नैवेद्य दाखवला जातो. पूर्वीच्या काळी नागपंचमीच्या दिवशी अनेक गोष्टींचं कटाक्षाने पालन केलं जात असे. ज्यामध्ये त्या दिवशी शेतात नांगर न चालवणे, हत्यारं न वापरणं. पण आता नागपूजेसाठी नागदेवतेच्या फोटोची किंवा मातीपासून अथवा धातूपासून बनवलेल्या नागप्रतिमेची पूजा केली जाते. तसंच या प्रतिमेला दूध, लाह्यांचा आणि खीर असा नैवेद्य दाखवला जातो. आजही बऱ्याच घरात नागदेवतेच्या प्रतिमेची पूजा करून चांदीच्या नागाचं दानही केलं जातं. नागदेवतेची पूजा करण्यासाठी नागाला दूध पाजण्याची काहीच आवश्यकता नाही. काही काळांपर्यंत नागपंचमीला गारूडी हे साप घेऊन येत असत आणि सापांना दूध पाजले जात असे. पण ते चुकीचे आहे कारण नाग दूध पित नाही. याउलट दूध पाजल्याने नागाचा मृत्यू होतो. आता मात्र संशोधन आणि लोकजागृतीमुळे या चुकीच्या प्रथांना विराम मिळाला आहे. नागपंचमीसाठी वेदकालापासून अनेक प्रथा आहेत. त्यापैकी एक कथा. सत्येश्वरी नावाची एक कनिष्ट देवी होती. सत्येश्वर हा तिचा भाऊ होता. सत्येश्वरीचा मृत्यू नागपंचमीच्या आदल्या दिवशी झाला. त्यामुळे भावाच्या शोकात सत्येश्वरीने अन्न ग्रहण केले नाही. सत्येश्वरीला तिचा भाऊ नागरूपात दिसला. तेव्हा तिने त्या नागरूपाला आपला भाऊ मानले. त्यावेळी नागदेवतेने वचन दिले की, जी बहीण माझा भाऊ म्हणून पूजा करेल, तिचे रक्षण मी करीन. त्यामुळेच त्या दिवशी नागाची पूजा करून प्रत्येक स्त्री नागपंचमी साजरी करते. तसेच दुसरी कथा : कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले. तेव्हापासून नागपंचमीची प्रथा सुरू झाली असेही मानले जाते. तसेच या दिवशी शेतकरी शेत नांगरत नाही. शेतात देखील पीक संरक्षणात सापाला शेतकऱ्याचा मित्र मानले जाते. शेतातील उंदरांचा नायनाट करुन, साप शेतकऱ्यांच्या पिकांचे रक्षण करीत असतो. त्यामुळे नागपंचमीला शेतकरी शेतात पुजा करतो. या दिवशी नववधू माहेरी येतात. झिम्मा, फुगड्या, झाडाला झोके बांधून खेळणे या गोष्टी करून, स्त्रिया हा सण आनंदाने साजरा करतात. नागपंचमीच्या दिवशी काहीही चिरू नये, कापू नये, तळू नये, चुलीवर तवा ठेवू नये, वगैरे असे अनेक संकेत पाळले जातात.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२९ जुलै

१) श्री.प्रकाश शंकर वडे
कामतआळी, अलिबाग,
२९-७-१९४९

२)श्रीम.सुशीला खंडेराव मोरे
कोळीवाडा, अलिबाग
२९-७-१९४६

# आईनेच घातले मुलींना विष

## •शहापूरमधील तीन बहिणींच्या मृत्यूचा उलगडा

**| ठाणे | प्रतिनिधी |**

